| | |
|---|---|
| नि.फौ.ख.दाखल दिनांक | .. १४/१२/२०२३ |
| नि.फौ.ख.नोंद दिनांक | .. १४/१२/२०२३ |
| नि.फौ.ख.निकाल दिनांक | .. २०/०६/ २०२६ |
| कालावधी ... | **०२ वर्ष ०६ महिने ०६ दिवस** |

| | |
|---|---|
| MHYA130016172023 | **दिग्रस येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी – बा. ना. गोडबोले)**<br>**–: न्यायनिर्णय :–**<br>(घोषित दिनांक २०.०६.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र. २०४/२०२३,**<br>**निशाणी क्र. ६५/ब**<br>**गु.र.नं.४२३/२०२३ पोलिस ठाणे दिग्रस** |
| वर्दीदार | संजय रोहिदास जाधव |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. ए. आर. राऊत |
| आरोपी | १. डोमा उर्फ प्रशांत अनिल चव्हाण<br>वय–२० वर्षे, धंदा–शेती<br>२. खिरु वाचु चव्हाण<br>वय–६६ वर्षे, धंदा–शेती<br>३. प्रविण खिरु चव्हाण<br>वय–३७ वर्षे, धंदा–मजुरी<br>४. सुनिल खिरु चव्हाण<br>वय–४२ वर्षे, धंदा–शेती<br>सर्व रा. विठाळा, ता.दिग्रस, जि.यवतमाळ |

| | |
|---|---|
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. शहारुख शेख |

## भाग –ब

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | १५/०७/२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १४/१२/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २७/०९/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०६/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २०/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशीला

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२. | डोमा उर्फ प्रशांत अनिल चव्हाण<br><br>खिरु वाचु चव्हाण | निरंक | निरंक | कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | प्रविण खिरु चव्हाण | | | | | | |
| ४. | सुनिल खिरु चव्हाण | | | | | | |

**भाग –क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | नथुल नेमीचंद जाधव (सा. क्र. १) | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | वासुदेव जगन्नाथ भिसनकर (सा. क्र. २) | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) | वर्दीदार |
| अ.सा.क्र.४ | विशाल रोहिदास जाधव (सा. क्र. ४) | साक्षीदार |
| अ.सा.क्र.५ | सुरेश देवराव ढाले (सा. क्र. ५) | साक्षीदार |

## ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी. सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी अ. अभियोग

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.क्र.-३६ (सा. क्र.१) | जप्ती व घटनास्थळ पंच |
| २ | नि.क्र.- ३७ (सा. क्र. २) | जप्ती व घटनास्थळ पंच |
| ३ | नि.क्र.- ३८ ते ३९ | घटनास्थळ/ जप्ती पंनाम्यावरील सही |
| ४ | नि.क्र.-४१ (सा. क्र. ३) | वर्दीदार |
| ५ | नि.क्र.- ४२ | वर्दीवरील सहि |
| ६ | नि.क्र.- ४३ | छापील एफ. आय. आर. |
| ७ | नि.क्र.-४९ (सा. क्र. ४) | साक्षीदार |
| ८ | नि. क्र. ५४(सा. क्र. ५) | तपासिक अंमलदार |
| ९ | नि.क्र.-५५ | घटनास्थळ पंचनामा |
| १० | नि.क्र.-५६ | जप्त पंचनामा |
| ११ | नि.क्र. ५७ | मुद्देमाल पावती |
| १२ | नि. क्र. ५८ | क्यूरीपत्र |
| १३ | नि. क्र. ५९ ते ६२ | चार सुचनापत्रावरील सही/अंगठा |

## ब. बचाव

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## क. कोर्ट निशाणी

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ओ. पी. क्र.०६/२०२५ | आडजात काठी |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक २०/०६/२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंडसंहिता कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२) प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, वर्दीदार हे रा. विठाळा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथील रहिवाशी आहे. दि. १३/०७/२०२३ रोजी सायंकाळी अंदाजे ०४.०० वाजण्याच्या सुमारास वर्दीदार यांच्या गायीचे वासरु हे आरोपी डोमा उर्फ प्रशांत अनिल चव्हाण यांच्या गोठ्यात चारा खायला गेल्यामुळे आरोपीने वासराला मारत आणले. तेव्हा वर्दीदार आरोपीला म्हणाले की, माझ्या वासराने तुझा जेवढा चारा खाल्ला तेवढा चारा मी तुला आणुन देतो पण तु त्याला मारु नको, असे म्हटले असता आरोपी क्र. १ ने शिवीगाळ करुन वर्दीदार यांना काठीने डाव्या बाजुने फासोळ्यावर मारले. तसेच आरोपी क्र. २ खिरु चव्हाण याने दोनही हाताला पकडून ठेवले व आरोपी क्र. ३ व ४ ने वर्दीदार याना थापड बुक्क्यांनी मारले. तसेच सर्व आरोपींनी वर्दीदार शिवीगाळ करुन, जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वर्दीदार यांनी आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, दिग्रस येथे वर्दी दिली.

३) वर्दीवरुन पोलीस ठाणे दिग्रस यांनी आरोपींविरुध्द अपराध क्रं. ४२३/२०२३ अन्वये भा.द.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता गुन्हा नोंदविला. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास तपासीक अंमलदार सुरेश ढाले पो.हे.कॉ. (बं. नं. ६०८) दिग्रस यांना सोपविण्यात आला. त्यांनी साक्षीदारांची विचारपुस करुन त्यांचा जबाब नोंदविला. त्याचप्रमाणे पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. वर्दीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यानंतर आरोपींविरुध्द वरील नमुद अपराधाकरिता दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

४) माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी २७ वर भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपींना त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने तो अमान्य असल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द दोषात्मक पुरावा व परिस्थिती आढळुन आली. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचा जबाब निशाणी क्र. ५७ ते ६० वर नोंदविण्यात आला.

५) प्रकरणातील मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | **मुददे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक १३/०७/२०२३ रोजी सायंकाळी अंदाजे ०४.०० वाजण्याच्या सुमारास मौजे–विठाळा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथे आरोपींनी संगणमताने वर्दीदारास काठीने डाव्या फासोळीवर मारुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व भारतीय दंड सहिता कलम ३२४ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| २ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख,वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगणमताने वर्दीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उददेशपुर्वक अपमान केला, ज्यामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा यासाठी त्यांना प्रक्षोभित केले ? | नाही |
| ३ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख,वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगणमताने वर्दीदार व त्यांच्या पत्नीला धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली ? | नाही |
| ४ | काय आदेश ? | अंतीम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

६) अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेला दोष सिध्द करण्याकरिता एकुण पाच साक्षीदार तपासले आहेत. ते म्हणजे जप्ती व घटनास्थळ पंच –नथुल नेमीचंद जाधव (सा. क्र. १), वासुदेव जगन्नाथ भिसनकर (सा. क्र. २), वर्दीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३), साक्षीदार विशाल रोहिदास जाधव (सा. क्र. २) व तपासिक अंमलदार सुरेश देवराव ढाले (सा. क्र. ५) हे होय.

**<u>मुददे क्र. १ ते ३ बाबत...</u>**

७) सदर मुददे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत. वर्दीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) यांच्या पुराव्यात असे आले की, दि. १३/०७/२०२३ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वाजता त्यांचे वासरु डोमा चव्हाण यांच्या घरात गेले होते. डोमा चव्हाण यांनी त्यांच्या वासराला मारत बाहेर आणले. त्यांच्या सुनेने वासराला मारु नका असे म्हणले. तरी देखील त्याने परत मारहाण केली. त्यांनी देखील वासराला मारु नको असे म्हणले असता, आरोपींनी त्याच्या डाव्या फासळीवर काठीने मारल्याचे सांगीतले. त्यानंतर थिरु चव्हाण यांनी त्यांचे हात धरल्याचे सांगीतले. प्रविण फोनवर सांगत होता की, तयाला हाणा मी सर्वांना पाहून घेतो. प्रविण चव्हाण, खिरु चव्हाण, अनिल चव्हाण यांनी त्याला धरले होते. त्यानंतर ते दवाखान्यात गेले. दोन दिवासांनी त्यांनी पोलिस ठाणे येथे वर्दी दिली.

८) अभियोग पक्षातर्फे वर्दीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी त्यांच्या पुराव्यात डोमा चव्हाण यांनी त्यांच्या सुनेने वासरुला मारु नका असे म्हणल्याचे दिसुन येते. परंतु अभियोग पक्षातफे साक्षीदार तपासी अंमलदार सुरेश ढाले (सा. क्र. ५) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांच्या उलट तपासामध्ये साक्षीदार संजय जाधव यांनी त्यांच्या जवाबात घटनास्थळावर त्यांची सुन हजर असल्याबद्दल काहीही सांगीतले नसल्याचे मान्य केले

आहे. तसेच साक्षीदार संजय जाधव यांच्या जवाबाचे अवलोकन केले असता, त्यांनी त्यांच्या जवाबात त्यांची सुन हजर असल्याबद्दल काहीही सांगीतले नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरील बाब साक्षीदार पहिल्यांदा न्यायालयासमोर सांगत असल्याचे दिसुन येते.

९) अभियोग पक्षातर्फे वर्दीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगीतले की, प्रविण फोनवर सांगत होता की त्याला मारा, तसेच प्रविण चव्हाण, खिरु चव्हाण, अनिल चव्हाण यांनी त्यांना धरले होते. वर्दीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपी प्रविण फोनवर सांगत होता की, त्याला मारा तसेच आरोपी प्रविण चव्हाण याने त्याला धरले होते ही गोष्ट स्पष्ट होत नाही. त्यामुळे साक्षीदार त्याच्या पुराव्यावर ठाम नसल्याचे दिसुन येते.

१०) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार विशाल रोहिदास जाधव (सा. क्र. ४) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगीतले की, ते व त्यांची पत्नी अरुणा शेताचे काम करुन सायंकाळी ५ वाजता घरी परत येतांना त्यांचा भाऊ जखमी दिसला. त्याने त्यांना सांगीतले की, वासरु चारण्याच्या कारणावरुन, डोमा, खिरु, सुनिल यांनी त्याला काडीने डाव्या बाजुच्या फासळीवर मारहाण केली. त्यांनी त्याला दिग्रस सरकारी दवाखान्यात नेले. परंतु अभियोग

पक्षातर्फे वर्दीदार संजय जाधव (सा. क्र. ३) यांनी त्यांच्या पुराव्यात त्यांनी घटनेबद्दल त्यांच्या भावाला सांगीतल्याबद्दल काहीही सांगीतले नाही. त्यामुळे साक्षदार विशाल जाधव (सा.क्र. ४) यांच्या पुराव्यावर साशंकता निर्माण होते. तसेच साक्षीदार विशाल जाधव यांनी त्यांच्या उलट तपसात घटना त्यांनी प्रत्यक्षात पाहिली नसल्याचे मान्य केले. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही. तसेच वर्दिदार संजय जाधव यांच्या पुराव्यास दुजोरा मिळु शकलेला नाही.

**११)** अभियोग पक्षातर्फे वर्दीदार साक्षीदार संजय रोहिदास जाधव (सा. क्र. ३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींनी त्याच्या डाव्या फासळीवर काठी मारल्याचे सांगीतले. परंतु अभियोग पक्षाने वैद्यकिय अधिकारी यांना तपासले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष वैद्यकिय अहवाल शाबित करु शकला नाही. तसेच अभियोग पक्ष वर्दीदाराने त्याच्या पुराव्यात सांगीतलेली जखम शाबित करु शकला नाही.

**१२)** अभियोग पक्षातर्फे (सा. क्र. ५) सुरेश देवराव ढाले यांना तपासन्यात आले, सुरेश (सा. क्र. ५) हे तपासी अम्मलदार असुन त्यांनी त्यांच्या पुराव्या असे कथन केले की, ते दि. १६.०७.२०२३ रोजी दिग्रस येथे बिट अमलदार म्हणुन कार्यरत होते. दि. १७.०७.२०२३ रोजीचा त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. दोन पंचासमक्ष समक्ष त्यांनी घटनास्थळावरुण एक आडजातीची

लाकडी काठी जप्त केल्याचे कथन केले. याउलट साक्षीदार जप्ती व घटनास्थळ पंच नथुल नेमीचंद जाधव (सा. क्र. १), वासुदेव जगन्नाथ भिसनकर (सा. क्र. २) यांचा पुरावा निशानी क्रं. ३६ व ३७ चे अवलोकन केले असता त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदार यांना उलट तपासात विचारले जावु शकणारे प्रश्न विचारण्यात आले. मात्र अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काहीही सदर साक्षीदाराने सांगितले नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही. थोडक्यात जप्ती व घटनास्थळ पंच (सा.क्र.१) (सा.क्र.२) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ/ जप्ती पंचनामा शाबीत करु शकला नाही.

**१३)** एकंदरीत संपूर्ण पुरावा, तथ्य व परिस्थीतीचे अवलोकन केले असता असे दिसते की, अभियोगपक्ष बळकटी देणारा व पुष्टी दायक पुरावा आणु शकला नाही. अभियोगपक्ष दोषारोप वाजवी संशयापलीकडे जावून सिध्द करण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुददा क्र. ४ बाबत...</u>**

**१४)** मुददे क्रं. १ ते ३ च्या निष्कर्षप्राप्तीनुसार भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपींविरुध्द सिध्द

करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर अपराधामधुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ४ यांची भारतीय दंड संहिता कलम ३२४,५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१)अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्रे व जामीनपत्रे रदद करण्यात आले आहेत.

३. जप्त मुद्देमाल आडजात काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम ४३७–ए, अन्वये आरोपींनी प्रत्येकी रु. १५,०००/– चे बेल बॉन्ड न्यायालयात जमा करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.06.20 16:33:12 +0530

ठिकाणः दिग्रस
दि. २०/०६/२०२६

(**बा. ना. गोडबोले**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दिग्रस

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. N. S. Jadhao, Stenographer G-3 |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Digras |
| Date | :- | 20/06/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | :- | 20/06/2026 |
| Judgment uploaded on | :- | 20/06/2026 |